# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
## दि. १८/०२/२०११ रोजी झालेल्या मंडळाच्या २६४ व्या बैठकीचे ठराव.

**बाब क्र.२६४/१ :- दि. ३१/०१/११ रोजी झालेल्या मुंबई मंडळाच्या २६३ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे.**

बाब क्र. २६३/७ वरील ठराव क्र. २६३/२९२६ ऐवजी २६३/२९२७ आणि बाब क्र. २६३/९ मध्ये ठराव क्र. २६३/२९२७ ऐवजी २६३/२९२८ अशी सुधारणा करण्यात यावी व ठराव क्र.२९२५, दि.३१/०१/११ या मध्ये टंकलेखनाची चुक झाली असून, ती सुधारणा खालीलप्रमाणे करण्यात यावी.

**ठराव क्र. २६३/२९२५ दिनांक :- ३१/०१/२०११.**

टिळकनगर,चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.४५, सत्स्वरुप सह.गृह.संस्था. मर्या., या संस्थेस पुनर्विकास करण्यासाठी यापूर्वी मुंबई मंडळाने ठराव क्र. २६०/२८५८ दिनांक ०५/१०/२०१० अन्वये यापूर्वी ठराव मंजुर केला आहे.सदरहू ठराव क्र. २६०/ २८५८ दि. ०५/१०/२०१० रद्द करुन, संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड १५०१.७५ चौ.मी. पैकी करमणुकीचे मैदान क्षेत्र (भाडेपट्टा करारनाम्यात समाविष्ट) १३०.९० चौ.मी. आणि भाडेपट्टा करारनाम्या नुसार भूखंडाचे क्षेत्र १०८७.४८ चौ.मी., करमणुकीचे मैदानाचे क्षेत्र वगळता उर्वरीत १५४.२७ चौ.मी. संस्थेस प्राधिकरण ठराव क्र. ६४२२ दि. ०७/०८/२००९ च्या आधिन राहुन वितरीत करण्यास,मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

२. संस्थेच्या अभिहस्तांतरीत क्षेत्रालगत करमणुकीचे मैदान क्षेत्र १२९.१० चौ.मी. संस्थेस प्राधिकरण ठराव क्र. ६४२२ आणि ६२६० मधील तरतूदीस आधिन राहुन वितरीत करण्यास,मुंबई मंडळ मंजूरी देत आहे.

३. संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड १५०१.७५ चौ.मी. पैकी करमणूकीचे मैदान क्षेत्र १२९.१० चौ.मी. वगळता उर्वरीत १३७२.६५ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र ३४३१.६२ चौ.मी. अधिक ४१.४१ चौ.मी. प्रति गाळा प्रमाणे ३६ गाळयांसाठी प्रोराटा क्षेत्र १४९०.७६ असे एकूण ४९२२.३८ चौ.मी. आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ १०६९.६४ चौ.मी. अधिक दि. १६/१२/९७, ०४/०८/०३ आणि ०७/०४/०४ रोजीच्या ना.ह.प्र. द्वारे अनुक्रमे ५३९.६७ चौ.मी., १७६.०० चौ.मी. आणि ३२३.७२ चौ.मी. असे एकूण २१०९.०३ चौ.मी. वितरीत केले आहे.

संस्थेने मागणी केल्याप्रमाणे एकूण अनुज्ञेय ४९२२.३८ चौ.मी. वजा यापूर्वी वितरीत २१०९.०३ चौ.मी. वगळता २८१३.३५ चौ.मी. वितरीत करता येते. उर्वरित २८१३.३५ चौ.मी. चटईक्षेत्रफळ रहिवासी वापरासाठी म्हाडाचा ठराव क्र. ६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु. १८,८००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. ७,५२०/- प्रती चौ.मी.) १२९.१० चौ.मी. करमणूकीचे मैदानाचे क्षेत्र म्हाडाचा ठराव क्र. ६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या १०% दराने (रु. १८,८००/- च्या १० % दराने म्हणजेच रु. १८८०/- प्रती चौ.मी.) आणि प्राधिकरण ठराव क्र. ६३९७ नुसार गटीत समितीने दिनांक २४/१२/१० रोजी घेतलेल्या दराबाबतच्या निर्णयास आधिन राहून खालील अटीशर्तींवर वितरीत करणे.

अ. सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत मुंबई म.न.पा. च्या इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेले कागदपत्रापैकी मिळकत व्यवस्थापक यांचे ना देय प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्रापूर्वी आणि नगर भू-मापन नकाशे व मिळकत पत्रिका मुंबई महानगर पालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्रासाठी मंडळाचे संमतीपत्र प्राप्त करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

क. संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अति. चटई क्षेत्रफळाच्या

अधिमुल्याच्या १२.५ टक्के इतकी (रु. २६,४४,५४९/-) रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी भरणा करणे आवश्यक राहिल.

ठराव एकमताने मंजुर.

**बाब क्र.२६४/२ :-** **मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

**ठराव क्र.२६४/२९२९** **दिनांक :-१८/०२/११**

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मुंबई मंडळ मंजूर करुन,प्राधिकरणाकडे प्राधिकरणाच्या सन-२०१०-२०११ चे सुधारीत अंदाजपत्रकात व सन-२०११-२०१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन, प्राधिकरणाचे मान्यतेस सादर करण्यास, अनुमती देत आहे.

सदरहू ठराव स्थायी करण्याची वाट न पाहता मुंबई मंडळ प्रशासनास सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणास आवश्यक कार्यवाहीस सादर करण्यास अनुमती देत आहे.

ठराव एक मताने मंजूर.